# महाराष्ट्र विधानपरिषद
## पत्रक भाग दोन
## शनिवार, दिनांक १७ नोव्हेंबर, २०१८ / कार्तिक २६, १९४० (शके)

**१७१. म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्याबाबत सर्व सन्माननीय विधानपरिषद सदस्यांना कळविण्यात येते की :-**

१. महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सोमवार, दिनांक १९ नोव्हेंबर, २०१८ पासून विधान भवन, मुंबई येथे सुरु होणाऱ्या सन २०१८ च्या तृतीय (हिवाळी) अधिवेशनासाठी द्यावयाच्या म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना दिनांक २० नोव्हेंबर, २०१८ पासून AMOIS या संगणकीय प्रणालीवर स्वीकारण्यात येतील. या संगणकीय प्रणालीवर म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे कार्यालय सुरु झाल्यापासून म्हणजेच सकाळी ९.३० वाजल्यापासून स्विकारण्यात येतील व विधानपरिषद सभागृहाची नियमित बैठक सुरु होण्यापूर्वी एक तास अगोदर बंद करण्यात येईल.

२. ONLINE पध्दतीने प्राप्त होणाऱ्या सूचनांना संगणकीय प्रणालीद्वारे आपोआपच अनुक्रमाने नोंदणी क्रमांक दिला जाईल.

३. तसेच OFFLINE पद्धतीने सूचना प्राप्त झाल्यास त्या सूचनांचा नोंदणी क्रमांक हा ONLINE पध्दतीने प्राप्त होणाऱ्या सूचना घेणे बंद झाल्यानंतरचा देण्यात येईल. तसेच या सूचना सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांच्या कार्यालयात स्वीकारण्यात येतील.

४. म.वि.प.नियम ९३ अन्वये सूचना पूर्णत: ONLINE पध्दतीने स्वीकारण्यात येणार असल्यामुळे सन्माननीय सदस्यांनी पुन्हा त्याच विषयाची पुनरावृत्ती करणारी सूचना OFFLINE पध्दतीने देवू नये अशी विनंती करण्यात येत आहे.

५. महाराष्ट्र विधानपरिषद नियम ९३ अन्वये सूचनेचा विषय हा निकडीचा सार्वजनिक महत्वाचा, स्पष्ट, एकाच विभागाशी संबंधित, मुद्देसूद व थोडक्यात ठेवून सूचनाधीन विषयाचा सारांश २ ते ३ ओळींमध्ये असणे आवश्यक आहे. तसेच सूचनेचा विषय ज्या विभागाशी संबंधित आहे त्या विभागाचे नांव स्पष्टपणे दर्शविण्यात यावे. OFFLINE पध्दतीने सूचना देताना सदस्यांनी त्या आपल्या लेटरहेडवर ४ प्रतीत सादर कराव्यात.

६. OFFLINE पध्दतीने दिलेल्या सूचनेवर एका पेक्षा जास्त सदस्यांच्या स्वाक्षऱ्या असतील तर कृपया स्वाक्षरीच्या खाली सदस्यांनी आपले नाव व त्याचा क्रम स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक आहे.

...२/-

७. OFFLINE पध्दतीने दिलेल्या सूचना या सदस्य किंवा सदस्यांचे अधिकृत स्वीय सहायक अथवा संबंधित विधिमंडळ पक्ष कार्यालयातील अधिकृत ओळखपत्र असलेल्या कर्मचाऱ्यांकडून स्वीकारण्यात येतील. अन्य खाजगी व्यक्तींमार्फत सदस्यांनी पाठविलेल्या सूचना तसेच, सन्माननीय सदस्यांच्या लेटरहेड व्यतिरिक्त अन्य कोणत्याही स्वरुपातील सूचना स्वीकारण्यात येणार नाहीत व विचारात देखील घेतल्या जाणार नाहीत याची कृपया सर्व सन्माननीय सदस्यांनी नोंद घेऊन आवश्यक सहकार्य करावे.

८. म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना स्वीकृती संबंधी व स्वीकृत सूचना चर्चेला घेण्यासंबंधीचा पूर्ण अधिकार मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचा राहील.

**विधान भवन,**
**मुंबई,**
**दिनांक : १७ नोव्हेंबर, २०१८**

**डॉ.अनंत कळसे,**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

**याची प्रत :-**

१) महाराष्ट्र विधानपरिषदेचे सर्व सन्माननीय सदस्य.
२) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव.
३) मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव.
४) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष.
५) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
६) संगणक कक्ष (WEBSITE)
७) एम.के.सी.एल. प्रशिक्षण विभाग.